# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## TERM-1 EXAMINATION (2026-27)

**MARATHI SET-TWO**

| | |
|---|---|
| Class : IX | Duration: **3** Hrs |
| Date : 04.09.2026 | Max. Marks: **80** |
| Admission No.: | Roll No.: |

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

### प्र 1 :– (आकलन ) अ: अपठित गद्यांश :–

शहराच्या बाजूला एक जंगल होते. त्या जंगलात असंख्य झाडे होती. जमिनीशी मुळे घट्ट ठेवत आकाशाकडे झेपावणाऱ्या फांदया रूप दाखवत होत्या. पाऊस म्हणजे बरहाचा महिना! वेली,फुले,फांदया,आनंदसोहळा,साजरा करायची.असंख्य पक्षी आपला आनंद सोहळा साजरा करत. पक्ष्यांचे सुश्राव्य संगीत तेथे ऐकायला मिळे. जंगलात अनेक प्राणी होते पण मानवी वस्तीत ते येत नसत.शहराच्या रस्त्यावरून फिरणाऱ्या लोकांना हे जंगल कितीतरी ऊर्जा देत होते. हे जंगल या शहराचे वैभव,सौदर्य होते. अनमोल संपत्ती होती. संध्याकाळी मंद वाऱ्यावर अनेक फुंलांचा सुगंध रस्त्यावरील लोकांना वेड लावत होता . आजी आपल्या नातवंडास झाडावर किलबिलणारी पाखरे दाखवत होती. तर कधी झाडावरील कैऱ्या पाहून नातू टाळया वाजवत होता त्याचा आनंद ओसंडून वाहत होता. शहरी माणसे मोठी हुशार व लबाड या जंगलाच्या सौंदर्याचा मोह पाडत.आजूबाजूच्या जागांच्या किमती गगनाला भिडल्या होत्या या जंगलाभोवती माणसाच्या घरटयांनी गर्दी केली होती.

पण एक दिवस काय झाले? काही सुशिक्षितांच्या डोक्यात आपल्या स्वार्थाच्या कल्पना आल्या आणि ही कल्पना सत्यात उतरवायला काही क्रूर हात समोर आले एका रात्रीत दोनशे झाडांची कत्तल झाली. झोपेतून जाग्या झालेल्या माणसांना सांगण्यात आले आता तुमच्यासाठी जंगलातून एक रस्ता तयार होणार आहे. आता मुख्य रस्त्यापर्यंत आपल्याला एक तास नाही तर फक्त पंधरा मिनिटं लागणार आहेत. आपला प्रवास सुखाचा होणार आहे.मित्रांनो आता जंगल नावाला राहिले आहे. आता आजीबरोबर नातू येथे येत नाही.अनेक उध्वस्त घरटी आणि पाखरांचा आक्रोश येथे मन हेलावून टाकतो .आजूबाजूच्या घरटयातली माणसे आता मूक झाली आहेत. कारण त्यांच्याच माणसांनी सुख वाटता–वाटता त्यांचे खरे सुख हिरावले आहे.सुशिक्षित माणसाच्या सुखाच्या कल्पना माणसाला आणि पुढच्या पिढीला कोठे नेणार आहेत? माणसे का अशी सुखाची व्याख्या बदलतात?

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा (कोणतेही पाच) (5X1=5)**

**1** एका रात्रीत किती झाडांची कत्तल झाली ?

**अ** चारशे **ब** तीनशे **क** दोनशे **ड** हजार

**2** कोणाचा आक्रोश येथे मन हेलावून टाकतो ?

**अ** पाखरांचा **ब** जनावरांचा **क** माणसांचा **ड** वृक्षाचा

**3** जंगलातील झाडांच्या फांदया कशा होत्या?

**अ** जमिनीकडे झुकलेल्या **ब** आकाशाकडे झेपावणाऱ्या

**क** वाऱ्यावर डोलणाऱ्या **ड** हिरव्यागार आणि उंच

**4** जंगलात पक्ष्यांचे कसे संगीत ऐकायला मिळे?

**अ** गोड **ब** सुश्राव्य **क** मधुर **ड** आनंदित

**5** शहरातून फिरणाऱ्या लोकांना जंगल काय देत असे?

**अ** ऊर्जा **ब** शांतता **क** संपत्ती **ड** पाऊस

**6** कुठल्या गोष्टी मन हेलावून टाकतात ?

**अ** माणसाची हुशारी व लबाडी **ब** माणसाच्या स्वार्थाच्या कल्पना

**क** उध्वस्त घरटी आणि पाखरांचा आक्रोश **ड** माणसाच्या सुखाच्या कल्पना

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :-(कोणतेही तीन) (3X1=3)**

**1** रस्त्यावरील लोंकांना कशाचे वेड लागे ?

**2** उताऱ्यात शहरी माणसाचा उल्लेख कसा केला आहे ?

**3** जंगलात कोण आनंद सोहळा साजरा करत असत?

**4** जंगलातील प्राण्यांनी कोणता नियम पाळला होता ?

**प्र 2:- (आकलन ) अः- अपठित पद्यांश**

छळून घ्या संकटांनो,संधी पुन्हा मिळणार नाही
कर्पुराचा देह माझा जळून पुन्हा जळणार नाही
साहीन मी आनंदाने तुमचे वर्मी घाव
असाच नेईन किनाऱ्याशी चुकलेली नाव
मार्ग बिकट आला तरी मागे वळणार नाही
निराश मी होणार नाही झुंजता तुमच्यासवे
मनी माझ्या जागतील आकांक्षांचे लाख दिवे
वेदना झाल्या तरी अश्रूही गळणार नाही
आव्हान माझे तुम्हांला चालून या माझ्यावरी
धैर्याची कटयार माझी पाजळील तुमच्यावरी
संकटांनों सावधान गाफील मी असणार नाही

**(अ)दिलेली कविता वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांमधून निवडा(कोणतेही चार(4X1=4)**

**1** कवी जवळ कोणती कटयार आहे?

**अ** सोन्याची **ब** पराक्रमाची **क** सावधतेचर **ड** धैर्याची

**2** मार्ग बिकट आला तर कवी काय करणार आहे?

**अ** मागे वळणार आहे **ब** नवी वाट शोधणार आहे

**क** मागे वळणार नाही **ड** प्रवास थांबविणार आहे.

**3** कवीला आपला देह कशाचा वाटतो?

**अ** मातीवा **ब** हाडामासांचा **क** कर्पूराचा **ड** फुलांचा

**4** कोणत्या मार्गाचा उल्लेख केला आहे?

**अ** सरल **ब** बिकट **क** वाकडा **ड** वळणदार

**5** लाख दिवे कशास म्हटले आहे?

**अ** संकटांना **ब** आकांक्षांना **क** वेदनांना **ड** अश्रूंना

**(आ) दिलेल्या कवितेच्या आधारे प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** कवी कटारींचा उपयोग कशासाठी करणार आहे?

**2** शेवटी कवी स्वतःबद्दल काय म्हणतात?

**3** कवी कोणला उद्देशून बोलत आहे?

**4** कवी आनंदाने काय सहन करणार आहे?

**5** कवीने कोणते आव्हान दिले आहे?

## विभाग :– ब ( 20 गुण)

**प्र 3 (अ) सुचनेनुसार प्रश्न सोडवाः– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

**1** खालील पैकी विशेष नामाचा पर्याय कोणता?.

**अ** साक्षी **ब** राग **क** पर्वत **ड** नदी

**2** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

काल दुपारी गारांचा पाऊस <u>पडला.</u>

**अ** नाम **ब** सर्वनाम **क** कियापद **ड** क्रियाविशेषण अव्यय

**3** <u>जगामध्ये</u> अभ्यासू विदयार्थी_आहेत. **(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)**

**अ** क्रियाविशेषण अव्यय **ब** विशेषण **क** शब्दयोगी अव्यय **ड** सर्वनाम

**4** मी तुला उदया माझ्या घरी बोलावणार आहे. **(दिलेल्या वाक्यात किती सर्वनामे आहेत)**

**अ** एक **ब** चार **क** तीन **ड** दोन

5 आई आली <u>व</u> तिने स्वयंपाक केला. **(आधोरेखित शब्दाची जात ओळखा)**

**अ** विशेषण **ब** उभयान्वी अव्यय **क** क्रियाविशेषण अव्यय **ड** अलंकार

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** परीक्षा जवळ आल्यामुळे मुले अभ्यास करतात.(भविष्यकाळ करा).

**2** गुरूजींमुळे वर्गातील सर्व मुलांना अभ्यासाची गोडी लागली. (या वाक्याचे भूतकाळी वाक्य करा)

**3** कन्याकुमारी हे एक सुंदर स्थान आहे. (काळ ओळखा )

4 काठी रात्री दोन इचांनी वाढणार .(काळ ओळखा)

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1आई गं! दमले बाई आता!

2 मीरा नेहमी खरे बोलते. ( नकारार्थी करा )

3 तुम्ही आतापर्यंत किती झाडे लावली ?

4 मुलांनों अभ्यास करा.

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 भार्या 2 मयंक 3 थट्टा

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 निरभ्र 2 खरेदी 3 लोभ

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 कुमार 2 उंदीर 3 थोरली

**प्र 4(क) वचन बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 नजर 2 यंत्र 3 बाटली

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 घरदार 2 वरखाली 3 यथाशक्ती

## विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन)** **(3X1=3)**

(1) फसलेल्या प्रयोगातूनही नंतर प्रयोग करणाऱ्याचे काय वाचतात?

(2) सखू आजी मुलांना कोणत्या गोष्टी सांगे?

(3) पहिली आगगाडी कोणत्या साली रूळावरून धावली?

(4) शिरीष आपल्या वडिलांना कोणत्या नावाने हाक मारीत असे?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (कोणतेही तीन)** **(3X1=3)**

(1) ऑलिंपिक सामने दर ––––– वर्षांनी होतात.

(2) ––––– ऋतूचे दिवस होते.

(3) माझे नाव शिरीष भागवत घरी –––– च म्हणतात.

(4) इंजिनावर अंग्रेजांचे मोठे –––– फडकत होते.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः–** **(1X3=3)**

(1) तुम्हाला समजलेले सखू आजीचे व्यक्तिचित्र रेखाटा–

(2) ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व ही संकल्पना स्पस्ट करा:–

(3) तुमच्या मते रेल्वेचे असलेले फायदे व तोटे सविस्तर लिहा:–

**प्र 5 ड:– वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा :–** **(5X1=5)**

**(मनावर कोरले जाणे / हकालपट्टी करणे / उसंत न लाभणे / भिकेला लागणे / ताब्यात घेणे )**

(1) परीक्षा जवळ आली की मैदानावर जायला मला वेळ मिळत नाही.

(2) शिवरायांनी मुगलांच्या ताब्यातील अनेक गडांवी कब्जा केला.

(3) बॅकेंचे कर्ज फेडता फेडता रामराव दरिद्री झाला.

(4) वर्गात सुप्रित खूप दंगा करत असल्यामुळे सरांनी त्याला वर्गातून बाहेर काढले.

(5) विश्वास नांगरे पाटील यांच्या भाषणातील काही वाक्ये माझ्या मनावर कायमची ठसलील .

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा:– ( कोणतेही चार )** **(4X1=4)**

(1) व्यायाम केल्याने कोणती शक्ती वाढते?

(2) माणसाचा सर्वात मोठा वैरी कवितेत कोणाला म्हटले आहे?

(3) व्यायामाशिवाय सात्त्विक भोजन कसे होते?

(4) वारकरी संप्रदायाचे कळस कोण झाले?

(5) संतकृपा झाली अभंगाचे संपादक कोण आहेत?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार)** **(4X1=4)**

(1) संतकृपा झाली –––––– फळा आली.

(2) ––––––– तयाचा किंकर.

(3) व्यायामे ––––––जाई दूरी.

(4) व्यायाम –––––– मित्र.

(5) –––– म्हणे फडकती ध्वजा.

**प्र 6 (क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा:–(कोणतेही एक)** **(1X3=3)**

व्यायामाने सशक्त स्नायू। व्यायामे मानव होई दीर्घायु ।
व्यायामाहीन पित्त,कफ,वात। जर्जर करिती अत्यंत।।

**किंवा**

1 ज्ञानदेवे रचिला पाया।
उभारिलें देवालया।।1।।
जनार्दन एकनाथ।
खांब दिधला भागवत।।2।।

**प्र 7 अ स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही तीन ) (5X1=5)**

**(1)** काझीरंगाची भूमी कशी आहे?

**(2)** गेंडा हा कशाचा भोक्ता आहे ?

**(3)** जंगलात फिरण्यासाठी असलेल्या हत्तीणीला कोणची उपमा दिली आहे

**(4)** जंगलात फिरण्यासाठी असलेल्या हत्तीणीचे नाव काय होते?

**(5)** ढगाला संस्कृत भाषेत काय म्हणतात?

**(6)** रानम्हशींची शिंगे कशी असतात?

## विभाग– ड लेखन– (गुण 15)

## लेखन

**प्र 8 अ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा किंवा मुद्दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) :– (1X6=6)**

**1 आमच्या शाळेतील क्रीडादिन**

**मुद्दे:–** मुलांसाठी उत्साहाचा दिन––विविध खेळांचे आयोजन –– विदयार्थ्यांमध्ये जिंकण्यासाठी चुरस–पालकांना झालेला आनंद––विजेत्यांचे सर्वाकडून झालेले कौतुक .

**2 पुस्तक एक खरा मित्र ......**

**मुद्दे :–** पुस्तकांचे आपल्या जीवनातील स्थान–– प्रेरणा देणे ––– शब्दशक्ती वाढविणे ––– खरा निःस्वार्थी मित्र –––कायम साथ देणारा––समाजमन घडवण्यात पुस्तकांचा वाआ

**3 पडक्या किल्याचे मनोगत**

मुद्दे :– पूर्वी असलेले महत्त्व ––– विविध किल्ले ––– जोपासना–––आजची स्थिती...खंत ....परिणाम.

**किंवा**

**1** एक गरीब माणूस–– कोंबडया पाळतो–––एक विचित्र कोंबडी––– सोन्याचे अंडे देणारी–––लोभ वाढणे––एकदम श्रीमंत होण्याची इच्छा ––कोंबडी कापणे––एकही अंडे न मिळणे–––पश्चाताप–––तात्पर्य .

**2** एक शिकारी ––शेतात जाळे––कबुतरांचा थवा ––शेतातील दाणे टिपणे –––जाळयात अडकणे––प्रमुखाचा सल्ला –––जाळे घेऊन उडा –––कबुतरांचे जाळयासहित उड्डाण –––सुटका –––तात्पर्य.

**प्र 8 (ब) पत्र लेखन :– ( कोणतेही एक ) (1X4=4)**

तुम्ही राधा/रमन कुलकर्णी, गांधी मार्ग,सोमवार पेठ,पुणे–404430,रहिवाशी आहे.तुमच्या भागातील वीज वारंवार खंडित होत असल्यामुळे वीज वितरण मंडळास तक्रार पत्र लिहा.

**किंवा**

वनिता/विनय पाटील, विदयानिकेतन विदयालय,सोलापूर येथून शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तके मागविणारे पत्र दुर्गा पुस्तक भंडारा,टिळक मार्ग,सोलापूर यांना पत्र लिहा :–

**प्र 8 (क) जाहिरात लेखन :–( कोणतेही एक )** **(1X5=5)**

**1** आपल्या परिसरातील आईस्क्रीम पार्लर साठी एक आकर्षक जाहिरात तयार करा –

**किंवा**

**2** आपल्या परिसरातील वाळके शक्ती व्यायाम शाळेसाठी एक जाहिरात तयार करा :–

**:::::::::::::::::::::: समाप्त :::::::::::::::::::::::::::**